तरुण भारत
www.tarunbharat.net

# मनोरुग्णांचे हक्क जपणे; एक सामाजिक जबाबदारी

चिन्मय पाठक
८३०८६५३५०५

जागतिक आरोग्य संघटनेतर्फे दरवर्षी १० ऑक्टोबरला 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' (World Mental Health Day) पाळला जातो. मानसिक आजारांविषयी असलेला कलंक, गैरसमज दूर करणे आणि मानसिक आरोग्याविषयी जनजागृती वाढवणे या हेतूने १९९० पासून हा 'जागतिक मानसिक आरोग्य दिन' पाळला जातो. बदलती जीवनशैली आणि त्यातून निर्माण होणारे ताणतणाव यामुळे संपूर्ण जगातच मनोविकारांमध्ये सातत्याने वाढ होताना आढळते. लॅन्सेट या जागतिक पातळीवरील सुप्रतिष्ठित शोध पत्रिकेच्या डिसेंबर २०१९ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार फक्त भारतातच सुमारे २० कोटी मनोविकारांचे रूग्ण आहेत. या रूग्णांमध्ये सुमारे पाच कोटी लोकांना नैराश्याने (Depression) तर तेवढ्याच जणांना चिंताविकाराने (Anxiety) ग्रासलेले आहे. उरलेल्या सुमारे १० लाख मनोरुग्णांना अन्य मानसिक आजारांनी ग्रासले आहे. मनोरूग्णांची वाढती संख्या आणि त्या अनुषंगाने वाढत जाणारी सुदृढ मानसिक आरोग्याची गरज लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघाने त्याचा समावेश १७ शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमध्ये (17 Sustainable Development Goals) २०१९ साली केला आहे. गरिबी दूर करणे आणि सर्वांसाठी अन्न उपलब्ध होणे या खालोखाल सुदृढ मानसिक आरोग्याला संयुक्त राष्ट्र संघाने महत्त्व दिले आहे.

मानसिक आरोग्य सुविधेचा वापर करणाऱ्या मनोरूग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना त्यांचा हक्कांची माहिती देणे, हा या लेखाचा उद्देश आहे. भारतातील मनोरुग्णांचे हक्क, मानसिक आरोग्य अधिनियम (२०१७) ने सुरक्षित करण्यात आले आहेत. या अधिनियमाव्यतिरिक्त राष्ट्रीय मानव हक्क संरक्षण समिती (NHRC), राष्ट्रीय स्नायू विज्ञान आणि मानसिक आरोग्य संस्था, बंगळुरू (National Institute of Mental Health and Neuro Sciences - NIMHNS) यांच्या संयुक्त विद्यमाने २००८ साली मनोरुग्णांच्या हक्कासाठी एक मार्गदर्शिका तयार करण्यात आली. या मार्गदर्शिकेप्रमाणे रूग्णांच्या हक्काचे चार विभाग करण्यात आले असून प्रथम भागात घरातील हक्क, दुसऱ्या भागात मानसोपचारदरम्यानचे हक्क तर तिसऱ्या भागात रूग्णालयात दाखल केल्यानंतरचे हक्क, चौथ्या भागात रूग्णांचे इतर हक्क.

## घरातील हक्क

रूग्णाला घरी सन्मानपूर्वक आणि प्रेमळ वागणूक मिळावी. घरी एखादा मनोरूग्ण आहे ही माहिती नातेवाईकांनी लपवू नये. रूग्णाला वेळच्या वेळी मनोविकारतज्ज्ञाकडे नेणे आणि गरज वाटल्यास मनोविकारतज्ज्ञांच्या सल्ल्याने रूग्णालयात दाखल करणे. रुग्णाला दाखल करताना त्याच्या घराचा अचूक पत्ता देणे. कुठल्याही प्रकारे रूग्णाबरोबरचे नाते आणि रूग्णाच्या आजाराची स्थिती लपवली जाऊ नये. रूग्णाच्या नातेवाईकाला त्याच्याबरोबर राहण्याचा हक्क आहे. रुग्णाबरोबर राहणे शक्य नसल्यास त्याला नियोजित वेळी भेटण्याचा हक्कदेखील नातेवाईकांना दिला आहे. रुग्णाच्या उपचारानंतर त्याला घरी नेणे, वेळच्या वेळी मनोविकारतज्ज्ञाकडे तपासणीसाठी आणणे, औषध लिहिल्याप्रमाणे दिले आहेत याची खात्री करणे. मनोविकारतज्ज्ञांकडे उपचाराचा आढावा घ्यायला जाण्याचा हक्क रूग्णाला आहे. रूग्ण पुन्हा पूर्वीसारखे आजारविरहित आयुष्य जगू शकेल, अशी आशा, आत्मविश्वास निर्माण करणे हे गरजेचे आहे. मानसिक आरोग्य प्रशिक्षित स्वयंसेवक याला घरी भेटायला आल्यास सहकार्य करणे गरजेचे आहे. या सर्व हक्कांची अंमलबजावणी ही रूग्णाच्या घरातील व्यक्तींची जबाबदारी आहे.

## उपचारादरम्यानचे हक्क

रूग्णालयात दाखल केलेल्या रूग्णाला दोरखंड किंवा हातकड्यांमध्ये बांधू नये. रूग्णाचा उन्माद नियंत्रित करण्यासाठी औषधोपचार करताना त्याला ग्लानी येते. त्याकरिता झोपण्याची व्यवस्था रूग्णालयात असावी. बाह्य रुग्ण विभागात बसायला मुबलक खुर्च्या असाव्या. तेथे भरपूर उजेड, खेळती हवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दूरदर्शन संच, वर्तमानपत्रे असावीत. उपचारांसाठी रूग्णाला वेळ लागू शकतो, हे लक्षात घेऊन तो विभाग शक्यतो उपाहारगृहाजवळ असावा. रूग्णालयातील कर्मचाऱ्यांना रूग्णांशी नीट आणि सन्मानपूर्वक वागावे यासाठी नीट आणि सन्मानपूर्वक वागणुकीचे प्रशिक्षण असावे. रूग्ण अथवा नातेवाईकांना अपमानास्पद वागणूक देऊ नये आणि उपचार घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला कुठल्याही कारणाने तपासणी आणि उपचार नाकारले जाऊ नये.

रूग्णालयात दाखल केलेल्या रूग्णाला पोटभर, रुचकर आणि पौष्टिक जेवण मिळावे. पिण्याच्या पाण्याची नीट व्यवस्था असावी. रूग्णालयाचा परिसर आणि मानसोपचार विभाग स्वच्छ असावा. या बरोबरच शौचालयदेखील स्वच्छ असावे. रूग्णालयात वाचनासाठी वर्तमानपत्रे, नियतकालिके, पुस्तके असावी. रुग्णालयात दूरदर्शन संच असावा. वरील सर्व हक्कांबरोबर रूग्णाला उपचारासाठी सहमती देण्याचा हक्क मानसिक आरोग्य अधिनियम (२०१७) प्रमाणे देण्यात आला आहे. रूग्ण १८ वर्षाखालील असल्यास त्याच्या नातेवाईकांना रूग्णाशी बोलून त्याच्या वतीने सहमती देता येते. आजारी व्यक्ती संमती देऊ शकत नसल्यास त्याच्या नामांकित प्रतिनिधीने रुग्णाच्या वतीने सहमती द्यावी.

## अन्य हक्क

फौजदारी स्वरूपाचे गुन्हे सोडून अन्य गुन्ह्यांमध्ये पकडलेल्या मनोरुग्ण संशयिताला कैद करणे हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे गुन्हा आहे. कारागृहात कैद केलेल्या सर्व मनोरूग्णांची भरती करण्यापूर्वी तपासणी होणे गरजेचे आहे. सर्व कैद्यांना मनोविकारतज्ज्ञांची मदत मिळविण्याचा हक्क आहे. देशातील सर्व तुरुंगांमध्ये मनोविकारतज्ज्ञांचा आणि नैदानिक मानसशास्त्रज्ञांचा समावेश असलेली चमू उपचारांसाठी उपलब्ध असावी. कैद केलेल्या प्रत्येक मनोरूग्णाला त्याच्या स्थितीचा वेळच्या वेळी आढावा मिळावा.

एक समाज म्हणून मनोरूग्णांना उपचारानंतर समाजात पुन्हा सन्मानपूर्वक सामील करून घेणे आपली नैतिक जबाबदारी आहे. मनोरुग्णाकडे हीन किंवा कलंकित भावनेने न बघता त्याचा स्वीकार खुल्या मानाने करणे ही सुदृढ मानसिक आरोग्य जपण्यासाठी आपण सर्वांनी दिलेले एक मोठे योगदान असेल.

*(लेखक टाटा समाजविज्ञान संस्था मुंबईच्या स्कूल ऑफ ह्यूमन इकॉलॉजीचे पदव्युत्तर शिक्षार्थी आहेत.)*

Powered by Bharati Web